ग्रामीण पाणी पुरवठा [illegible]
ग्रामीण नळ योजनांसाठी दरडोई खर्चाची
प्रमाणके.

महाराष्ट्र शासन,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्रमांक:ग्रापापु-१०९५/सीआर-११२४/पा.पु.०७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक: १८ मे, १९९६.

वाचा :- [१] शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. ग्रापापु-१०९२/सीआर-४४५/३९-अ, दिनांक ३ नोव्हेंबर, १९९२.

[२] शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. ग्रापापु-१०९५/सीआर-१०७५/३९-अ, दिनांक १३ नोव्हेंबर, १९९५.

[३] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:डॉविका-१०८९/प्र.क्र. ६६/योजना-१९, दिनांक २३ नोव्हेंबर, १९९०.

[४] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:डॉविका-१०९४/प्र.क्र. ३६/का. १४५५, दिनांक २७ सप्टेंबर, १९९४.

प्रस्तावना:- अनुक्रमांक-१ येथे नमूद केलेल्या दिनांक ३ नोव्हेंबर, १९९२ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरावरील तसेच स्थानिक स्तरावरील मंजूर करावयाच्या ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाची प्रमाणके विहित करण्यात आली होती. त्यानंतर अ.क्र. २ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये दररोज/दरडोई ४० लिटर याप्रमाणे करण्यात येणा-या पाणी पुरवठ्यात दररोज/दरडोई ५५ लिटर पर्यंत वाढ करण्यात आली आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीत ग्रामीण नळ योजनांसाठी लागणारी साहित्य सामुग्री व मजुरीच्या दरात आलेली भाववाढ लक्षात घेता उपरोक्त [१]प्रमाणे ३ नोव्हेंबर, १९९२ मध्ये विहित केलेली दरडोई खर्चाची प्रमाणके सुधारित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत माणशी/दिवशी ५५ लिटर या प्रमाणात ग्रामीण नळपाणी पुरवठा योजना आखण्यात व या योजनांमध्ये गावातील जास्तीत जास्त ३० टक्के पर्यंत घरांना खाजगी जोडण्या द्याव्यात. खाजगी नळ जोडणी धारकांना दररोज/दरडोई ७० लिटर प्रमाणे व उर्वरित ७० टक्के घरांना दररोज/दरडोई ४० लिटर प्रमाणे सार्वजनिक नळांव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात यावा, या शासनाच्या निर्णयानुसार दरडोई खर्चाची प्रमाणके या निर्णयाच्या दिनांकापासून खाली निर्देशिल्याप्रमाणे राहतील, असे आदेश शासन देत आहे :-

.....२/-

दरडोई खर्चाची कमाल मर्यादा

क्षेत्र

[अ] कोकण वगळता राज्याच्या इतर भागासाठी

| | |
|---|---|
| [१] निर्देशित डोंगरी भाग | रुपये २१२०/- |
| [२] ३० मीटरपेक्षा जास्त स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना. | रुपये १५२०/- |
| [३] ३० मिटरपर्यंत स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना. | रुपये १३२०/- |

[ब] कोकण क्षेत्रासाठी

| | |
|---|---|
| [१] निर्देशित डोंगरी भाग | रुपये २३३०/- |
| [२] ३०मिटर्स पेक्षा जास्त स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना. | रुपये १६७०/- |
| [३] ३० मिटरपर्यंत स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना. | रुपये १४५०/- |

२. हा शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-२०३/व्यय-१५, दिनांक १७ एप्रिल, १९९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ कृ. न. देशमुख ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] मा. राज्यपालांचे सचिव.
२] मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३] मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
४] सर्व मंत्र्यांचे/राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
५] सर्व विभागीय आयुक्त.
६] सर्व जिल्हाधिकारी.
७] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
८] सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१.
९] मुख्य अभियंता, [ग्रामीण] महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई. [७० अतिरिक्त प्रतींसह संबंधीत अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांना पाठविण्यासाठी.]
१०] संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
११] भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सर्व उप संचालक. [ प्रत्येकी ७ अतिरिक्त प्रतींसह त्यांच्या क्षेत्रातील वरिष्ठ भूवैज्ञानिकांना पाठविण्यासाठी.]